डॉ. किरण हरीश श्रीवत्री, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या नियत वयोमान सेवानिवृत्तीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः निवनि-२०१७/प्र.क्र.४१९/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीखः २४ एप्रिल, २०१८

वाचा :- शासन निर्णय क्र.सेवानि १८१५/प्र.क्र.२०१६/सेवा-२, दि.०३.०९.२०१५.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेल्या डॉ. किरण हरीश श्रीवत्री, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे यांचा जन्म दिनांक ०४.०६.१९५७ असा आहे. त्यांचा जन्म दिनांक विचारात घेता, त्यांना वयाची ५८ वर्षे ही ०३.०६.२०१५ रोजी पूर्ण होतात. त्यानुसार त्या दि.३०.०६.२०१५ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्या असत्या. तथापि, वाचा येथील सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०३.०९.२०१५ मधील तरतुदीनुसार सेवानिवृत्तीच्या वयात वाढ केल्याने त्यांची वयाची ६० वर्षे ही दि.०३.०६.२०१७ रोजी पूर्ण होतात व त्यानुसार त्यांचा नियत वयोमान सेवानिवृत्तीचा दिनांक हा ३०.०६.२०१७ असा आहे. त्यामुळे डॉ. श्रीवत्री ह्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक १० (१) मधील तरतुदींनुसार दि.३०/०६/२०१७ (म.नं.) पासून नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्या असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

२. डॉ. श्रीवत्री, वैद्यकीय अधिकारी यांची दि.२०.०५.१९८६ च्या शासन निर्णयान्वये नियमित नियुक्ती झालेली आहे. नियमित नियुक्तीपूर्वीची त्यांची सेवा ही अस्थायी स्वरुपाची आहे, ती सेवा सेवानिवृत्तीविषयक लाभांसाठी गृहीत धरता येणार नाही. त्यामुळे डॉ. श्रीवत्री यांची नियमित नियुक्तीच्या दिनांकापासुन सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंतची सेवा निवृत्तीवेतनासाठी गृहीत धरुन त्यांना निवृत्तीवेतन विषयक अनुज्ञेय सर्व लाभ नियमानुसार अदा करण्यात यावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२४१२१९५१७५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.04.24 18:17:35 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे.
४) वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
७) डॉ. किरण हरीश श्रीवत्री, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांचे मार्फत)
८) निवडनस्ती सेवा-३.